## खासदार कक्ष, महाराष्ट्र सदन

महाराष्ट्र सदनात मा.निवासी आयुक्त यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्र परिचय केंद्रामार्फत 12 जानेवारी 2012 रोजी खासदार कक्षाचे पुनर्गठन झाल्यानंतर वर्षभरात विविध नवीन उपक्रम व मोहिम राबवून अधिक समर्पकपणे खासदार कक्षाचे कामकाज सुरु आहे.त्याचे संक्षिप्त विवरण पुढीलप्रमाणे.

### : महाराष्ट्र सदनातील खासदार कक्षाची रचना :

खासदार कक्षाची रचना खालीलप्रमाणे आहे.

1. उपसंचालक (माहिती) - श्री. दयानंद कांबळे
2. उपसंपादक – श्रीमती अंजु निमसरकर- कांबळे
3. लिपीक टंकलेखक - श्री निलेश देशमुख
4. वाहनचालक - श्री किशोर वानखडे
5. शिपाई – श्री. दिपक देशमुख

### खासदार कक्षामार्फत प्रामुख्याने होणारे कार्य

1. महाराष्ट्रसंदर्भातील विविध प्रश्नांसाठी आवश्यक असणारी माहिती खासदार महोदयांच्या मागणीवरुन पुरविली जाते, यासाठी राज्य शासनाच्या विविध विभागासोबत संपर्क साधला जातो.
2. खासदार महोदयांना आवश्यकतेनुसार इंटरनेट सुविधा,टंकन कार्य आणि राज्यातील माहिती पुरविली जाते.

3. निवासी आयुक्त कार्यालयाकडे येणाऱ्या इंग्रजी व मराठी भाषेतील अनुवादाचे कार्य केले जाते.

4. संसंदेच्या विविध समित्यांचे महाराष्ट्रातील दौरे/ भेटींकरीता समन्वय केला जातो.

6. संसदेतील राज्यसभा/लोकसभा तारांकित/अतारांकित प्रश्न माहिती घेणे व कळविणे.

7. संसंदेच्या विविध समित्यांच्या बैठकींसाठी संसदेतील प्रवेशिका मिळविणे व पुरविण्याचे कार्य केले जाते.

8. खासदार महोदयांशी संपर्क साधण्यासाठी mpcellmaharashtra@gmail.com हा स्वतंत्र इमेल तयार करण्यात आला आहे.

9. ई-मेल आयडीवरुन सर्व खासदार महोदयांशी महत्वांच्या निर्णयाची देवाण-घेवाण होते. काही महत्वाचे वृत देखील या मेलवरुन दिले जाते.

10. मुंबई मंत्रालय किंवा मुख्यमंत्री कार्यालयाकडून आलेल्या महत्वाच्या दस्ताऐवजाचे खासदार महोदयांना वाटप केले जाते. यामध्ये बैठकांचे अहवाल, आर्थिक पाहणी व प्रमुख विषयांवरील बैठकींचा सहभाग असतो.

11. खासदार कक्षामध्ये खासदारांसाठी दोन इंग्रजी,एक हिंदी व एक मराठी दैनिक सकाळी उपलब्ध करण्यात येतात. याशिवाय आदल्या दिवशींचे पाच प्रमुख मराठी दैनिक , दुपारी 3 नंतर उपलब्ध करण्यात येतात.

12. खासदार महोदयांनी विचारणा केल्यानुसार मुख्यमंत्री व अन्य मंत्री महोदयांच्या नवी दिल्ली दौऱ्याबाबतची अद्यावत माहिती दिली जाते.

13. महाराष्ट्र सदन व महाराष्ट्र परिचय केंद्र यांच्यातर्फे आयोजित विविध कार्यक्रमांना सर्व खासदार महोदयांना नियमित निमंत्रण दिले जाते.

14. महाराष्ट्रातील केंद्रीय मंत्री/ खासदार यांच्यातर्फे आयोजित विविध कार्यक्रमांमध्ये समन्वयाचे कार्य खासदार कक्ष बजावते तसेच आवश्यकतेनुसार समन्वय करते.

15. राज्यातील महत्वाच्या बैठका, दिल्लीतील आयोजित विविध कार्यक्रम याची माहिती विचारणा केल्यानुसार दिली जाते.

16. संसद अधिवेशन पूर्व होणाऱ्या नवी दिल्लीतील बैठकांचे व्यवस्थापन मुख्यमंत्री सचिवालयातील विशेष कार्यकारी कक्षाच्या निर्देशनात करण्यात येते. या बैठकांचे अहवाल व प्रगती मा. सदस्यांना वेळोवेळी पाठविण्यात येते.

17. खासदार कक्षाकडून नियमितपणे मा.सदस्यांचे संपर्क विवरण www.maharashtrasadan.org या महाराष्ट्र सदनाच्या वेबसाईटवर अपडेट करण्यात येते.

18. केंद्रीय मंत्री, राज्यातील मंत्री, खासदार,सनदी अधिकारी,दिल्लीतील मराठी पत्रकार, मराठी मंडळे यांची अद्यावत माहिती वेगवेगळ्या याद्या मधे एकत्रित केली जाते व मागणीनुसार उपलब्ध करुन दिली जाते.

19. सर्व खासदार महोदयांच्या स्वीय सहायकांशी या कक्षाचा सतत संपर्क असतो. यांच्यामार्फत मागविलेली माहिती नियमित पुरविण्यात येते.

20. दिल्लीस्थित महाराष्ट्र परिचय केंद्रातील ग्रंथालयातील पुस्तकांची उपलब्धता आवश्यकतेनुसार व त्यांचे मागणीनुसार त्यांना उपलब्ध केली जातात.

21. खासदार महोदयांना नियमितपणे दर महिन्याला माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे प्रसिध्द होणारे मासिक लोकराज्य व महाराष्ट्र अहेड त्यांचे नवी दिल्ली निवासस्थानी उपलब्ध करुन देण्यात येतात.

22. युपीएससीच्या अभिमत मुलाखतीचे आयोजन महाराष्ट्र सदन, महाराष्ट्र परिचय केंद्रामार्फत केले जाते. यामध्ये खासदार कक्षाचे कार्यवहनाची भूमिका असते.

23. विविध राज्यांच्या खासदार कक्षांशी सतत संबंध ठेवण्यात येत असून इतर राज्यांप्रमाणे नवीन उपलब्ध होणाऱ्या सर्व सुविधा देण्यासाठी वेळोवेळी कामकाजात सुधारणा करण्याचा अवलंब करण्यात येत आहे.

(दयानंद कांबळे)

उपसंचालक(मा.)

महाराष्ट्र परिचय केंद्र , नवी दिल्ली